खेडतालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर, ता.खेड जि.पुणे ४१०५०५

# वाणिज्य विभाग

## प्रथम वर्ष वाणिज्य

## सत्र २

## विषय

## सहकार:सिद्धांतआणिकार्यपद्धती-II

## प्रकरण ४

## सहकारी शिक्षण व प्रशिक्षण

## Co-operative Education and Training

# प्रकरण ४
# सहकारी शिक्षण व प्रशिक्षण
# Co-operative Education and Training

**प्रस्तावना :-**

औद्योगिक क्रांतीच्या प्रभावाने भांडवलशाही देशातून इंग्लंडमध्ये सहकार चळवळीचे आगमन झाले या चळवळीचा रॉशडेल हा प्रणेता होता. सहकाराची जी तत्वे विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत मान्य होती ती तत्वे 'रॉशडेल तत्वे' या नावाने सुपरिचित होती. या तत्वांमध्ये सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण हे एक महत्त्वाचे तत्त्व होते. सहकाराचा पाया मजबूत करण्यासाठी सहकार चळवळीत कार्य करणाऱ्या सभासदांना, कर्मचाऱ्यांना व इतर वर्गांना प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. सहकारी संस्थेचे सभासद व कर्मचाऱ्यांना सहकारी संस्थेचे प्रशासन प्रभावी पद्धतीने करण्यासाठी, सहकारी संस्थांना चांगले नेतृत्व देण्यासाठी शिक्षण आणि प्रशिक्षणाची गरज आहे. सहकाराची मूळ संकल्पना, उद्देश, महत्त्व, तत्त्वे आणि सहकार चळवळ कुणासाठी हे जोपर्यंत संबंधित घटकांना निश्चित माहित होत नाही, तोपर्यंत संबंधितांची भूमिका ही प्रभावी ठरत नाही, म्हणून शिक्षण व प्रशिक्षणाची गरज निर्माण होते.

**सहकारी शिक्षण व प्रशिक्षण व्याख्या**

वैटकिन डब्ल्यू. पी. यांच्या मते : सहकार म्हणजे शैक्षणिक कार्यक्रम राबविणारी आर्थिक चळवळ. म्हणजेच आर्थिक कार्यक्रम राबविणारी शैक्षणिक चळवळ होय.

## सहकाराच्या शिक्षण व प्रशिक्षणाची उद्दिष्टे

१. आर्थिक व्यवहार गैरव्यवहार टाळणे :

सहकार ही विकासाची चळवळ आहे, परंतु या चळवळीतून स्वतःचा विकास किंवा स्वाहाकार करायचा नसतो. सामाजिक विकास करत असताना संस्थेच्या माध्यमातून सर्व सभासदांचा आर्थिक विकास ही कल्पना विचारात घेतली जाते. सहकारी संस्था स्थापन करून संस्थांच्या आर्थिक आणि इतर संसाधनांचा पर्याप्त उपयोग करणे, गैरव्यवहार टाळणे, अनावश्यक खर्च टाळणे इ. बाबींवर भर देण्याची गरज असते. परंतु प्रत्यक्षात असे होताना दिसत नाही. त्यामुळे संस्थेच्या आर्थिक साधनांचा गैरवापर टाळून सामाजिक संपत्तीचा नियोजित पद्धतीने विकास करून घेण्यासाठी सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. त्यामुळे आर्थिक व्यवहार गैरव्यवहार टाळणे हा सहकार शिक्षण व प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे.

२. सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनात कार्यक्षमता आणणे :

सहकारी संस्था फक्त अल्पदराने कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्था नसून विविध प्रकारच्या सहकारी बँका, पतपुरवठा संस्था, खरेदी-विक्री संस्था, बहुउद्देशीय संस्था, दुग्धविकास व कुक्कुटपालन संस्था, औद्योगिक सहकारी संस्था, ग्राहक सहकारी भांडार, गृहनिर्माण संस्था इ. प्रकारच्या संस्था आहेत. या

संस्थांचे व्यवस्थापन चांगले व्हावे, त्यांच्या व्यवस्थापनात व प्रशासनात सुसूत्रता असावी, संस्थेचे रेकॉर्ड अद्यावत राहावे, लेखापरीक्षण नीट व्हावे आणि संस्था प्रभावीपणे चालावेत. यासाठी संस्थांच्या सर्वच घटकांना प्रशिक्षण आणि शिक्षण देऊन त्या सभासदास कार्यक्षमता वाढविणे.

३. सुसंस्कृत व जबाबदार सभासद निर्माण करणे :

भारतात सहकार चळवळ ही सरकारच्या प्रयत्नाने, पाठिंब्याने आणि पुरस्काराने सुरू झालेले आहे आणि ही चळवळ कायमस्वरूपी सरकारची चळवळ रहावी असे कोणाही व्यक्तीस वाटणार नाही, कारण ही चळवळ सभासदांची व कार्यकर्त्यांची चळवळ व्हावी आणि त्यातून सुसंस्कृत जबाबदार सभासद निर्माण व्हावेत आणि ह्या सदस्यांनी ही चळवळ सर्वसामान्यांच्या विकासासाठी राहावी या उद्देशातून सहकार चळवळीच्या शिक्षण आणि प्रशिक्षणाची गरज आहे.

४. जबाबदारीची जाणीव निर्माण करणे :

सहकार शिक्षण व प्रशिक्षणामुळे संबंधित व्यक्ती, संबंधित घटक व सभासद यांना सहकार चळवळीची पुरेशी, योग्य, विश्वसनीय आणि अद्यावत माहिती प्राप्त होते. त्यामुळे सभासदांमध्ये सहकार्याबद्दलच्या सर्व संकल्पना सुस्पष्ट होतात. सभासदांमध्ये विश्वासाची,स्वावलंबनाची, नैतिकतेची व विकासाची भावना वृद्धिंगत करणे आणि पर्यायाने जबाबदारी पूर्ण करण्यास प्रेरित करणे.

५. परस्परसंबंधांमध्ये विश्वासाची भावना करणे :

एच. डी. ऑर्थर आणि जोन्स यांनी परस्पर संबंधांमध्ये विश्वासाची भावना निर्माण करणे हे उद्दिष्ट सांगितले आहे. सर्वसामान्य व्यक्तीपेक्षा प्रशिक्षित व्यक्ती आणि कार्यकर्ते यामध्ये एकमेकांबद्दल परस्परसंबंध आणि विश्वासाची भावना निर्माण होते असे ह्या तज्ञांचे मत आहे. प्रशिक्षित कार्यकर्ते चांगले सभासद होऊन सहकारी संस्थांच्या माध्यमातून समाजाची सेवा करू शकतात. सामाजिक परिवर्तनासाठी परस्परसंबंधांमध्ये विश्वासाची भावना निर्माण होणे आवश्यक आहे.

६. सहकारक्षेत्राचा निकोप विकास करणे :

लोकशाही नियंत्रण हे सहकाराचे महत्त्वाचे तत्त्व सुरुवातीपासून मानले गेलेले आहे. लोकशाहीत सभासदामधुन सक्षम संचालक मंडळ निवडले जाते. सहकारात निकोप धारणा वृद्धिंगत करणे आवश्यक आहे. संचालक मंडळाच्या कार्यपद्धतीवर नियंत्रण ठेवणे, आर्थिक व्यवहार बघणे व तपासणी करणे यासाठी सभासदांना शिक्षण व प्रशिक्षण आवश्यक आहे. सहकार शिक्षण व प्रशिक्षणामुळे सहकारातील गटबाजी व भ्रष्टाचार कमी करून सहकारक्षेत्राचा निकोप विकास करणे शक्य आहे.

७. कल्पक व दूरदृष्टी असलेले नेतृत्व निर्माण करणे :

सहकार चळवळ ही प्रामाणिक, कार्यक्षम, स्वावलंबी, स्वयंपूर्ण, शिक्षित आणि जागरूक सभासदांची चळवळ निर्माण करण्यासाठी शिक्षण व प्रशिक्षणाची गरज आहे. हे सर्व गुण असलेले कार्यकर्ते निर्माण झाले तरच सरकार चळवळीसाठी कल्पक आणि दूरदृष्टी असलेले आणि चळवळीच्या विकासासाठी झटणारी कार्यक्षम नेतृत्व निर्माण होऊ शकेल. शिक्षण व प्रशिक्षणातून असे कल्पक व दूरदृष्टी असलेले नेतृत्व निर्माण करणे.

८. सहकार तत्त्वे समाजात रुजविणे :

सहकार चळवळीच्या विकासाची संकल्पना, उगमाची कारणे, सहकाराचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व, सामाजिक व आर्थिक परिवर्तनातील भूमिका आणि सहकाराचे तत्त्व या माहितीचे शिक्षण आणि प्रशिक्षण

सहकार चळवळीतील संबंधित घटकांना दिल्यास सहकार्याची भूमिका समाजात रुजण्यास मदत होते. सहकार आणि सहकार चळवळ व समाज यांना एकत्र आणण्यासाठी तसेच त्यांच्यात जवळीक निर्माण करण्यासाठी सहकाराची तत्वे समाजात रुजवणे आवश्यक आहे ते काम सहकार शिक्षण व प्रशिक्षणातून शक्य होते.

९. आर्थिक व सामाजिक प्रगतीची भावना निर्माण करणे :

सहकार ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांची, त्यांच्या प्रगतीसाठी एकत्रित येण्याची आणि त्यानुसार कार्य करण्याची चळवळ आहे. कोणत्याही प्रकारचे शिक्षण व प्रशिक्षण नसताना एकत्रित येणाऱ्या सभासदांना उद्दिष्टानुसार प्रशिक्षण दिले तर त्यांच्यामध्ये असलेली आर्थिक आणि सामाजिक प्रगतीची भावना अधिक वृद्धिंगत होण्यास मदत होते.

१०. सहकारी संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन देणे :

सहकार शिक्षण आणि प्रशिक्षण यामुळे सहकारी संस्थांच्या संदर्भातील पूर्ण माहिती आणि ह्या चळवळीची भूमिका समजते. सहकार चळवळ हे आर्थिक विकासाचे साधन असून या साधनाद्वारे परिवर्तन घडवून आणता येते ही जाणीव कार्यकर्त्यात रुजली की कार्यकर्ते स्वतः सहकारी संस्थांच्या स्थापनेमध्ये निस्वार्थवृत्तीने, सामाजिक हित डोळयासमोर ठेऊन सहकारी संस्था स्थापन करण्याच्या उद्देशातून कार्य करू लागतात.

११. स्वावलंबनाची जाणीव निर्माण करणे :

सहकार चळवळ ही लोकशाही चळवळ आहे लोकशाही पद्धतीने स्वावलंबनाचा पाया मजबूत करण्याचा प्रयत्न या चळवळीमुळे होतो ही चळवळ विशिष्ट व्यक्तींच्या इशाऱ्यावर किंवा लहरीवर चालते असा सतत आरोप करण्यात येतो सहकाऱ्याशी संबंधित घटकांना जर उचित पद्धतीने शिक्षण आणि प्रशिक्षण देऊन त्यांना सहकाराच्या माध्यमातून स्वावलंबनाचे शिक्षण दिल्यास सभासदांमध्ये स्वावलंबनाची जाणीव निर्माण होण्यास मदत होते.

१२ . सरकारी मदतीचा पूर्णपणे उपयोग करून घेणे :

भारतातील सहकार चळवळ ही सरकारच्या मदतीवर चालणाऱ्या आणि स्थापन झालेली चळवळ आहे. या चळवळीत सहकारी संस्थांना सरकारकडून मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत मिळते. मात्र या मदतीचा सदुपयोग व्हावा.

१३ . अनावश्यक खर्च टाळणे :

सहकारी संस्थांमध्ये अनेक प्रकारचा खर्च व्यवस्थापनासाठी करण्यात येतो. परंतु हा खर्च आवश्यकतेनुसार आवश्यक खर्च म्हणून करण्यास हरकत नाही पण अनेक सहकारी संस्थांमध्ये आवश्यक खर्चापेक्षा अनावश्यक खर्चाला प्राधान्य देण्यात येते. अनावश्यक खर्च हा अनुत्पादक स्वरूपाचा असतो, त्यामुळे संस्था आर्थिकदृष्ट्या डबघाईस येतात त्यामुळे सहकारी संस्थांच्या संबंधित घटकांना आवश्यक खर्च टाळण्याची शिक्षण व प्रशिक्षण देणे आवश्यक ठरते.

१४ . लोकशाहीचा पाया मजबूत करणे :

सहकारी संस्थांचे व्यवस्थापन लोकशाही पद्धतीने म्हणजेच एक सभासद आणि एक मत या पद्धतीनेच करण्यात येते. लोकशाहीमध्ये कार्यक्षम प्रतिनिधी निवडून देणे जसे आवश्यक मानले जाते तसेच सहकारी संस्थांचे व्यवस्थापन चांगले करण्यासाठी लोकशाही पद्धतीने संचालक मंडळाची निवड करण्यात येते. सभासदांना लोकशाही प्रणालीचे शिक्षण याद्वारे मिळते. लोकशाही शासन प्रणाली बाबतच्या भावना आणि कल्पना दृढ होण्यासाठी सभासदांना शिक्षण देणे आवश्यक आहे.

## राष्ट्रीय सहकारी संघाची भूमिका/(Role of National Co-operative Union of India-NCUI)

राष्ट्रीय सहकारी संघाला नॅशनल कोऑपरेटिव युनियन ऑफ इंडिया लिमिटेड (NCUI) नावाने ओळखले जाते. युनियनचे मुख्यालय ३, सिरी संस्था परिसर, ऑगस्ट क्रांती मार्ग, नवी दिल्ली-११००१६ येथे असुन राष्ट्रीय सहकारी संघाचे कार्यक्षेत्र संपूर्ण भारतभर विस्तारलेले आहे.

**राष्ट्रीय सहकारी संघाची उद्दीष्टे**

१. सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे आणि सहकार्याची तत्त्वे आणि पद्धती लोकप्रिय करणे.

२. आंतर-सहकारी संबंध विकसित करणे आणि विविध क्षेत्रातील सहकारी चळवळीच्या समन्वित कार्यास मदत करणे.

३. संशोधन, सहकारी समस्यांची तपासणी आणि सहकारी विकासासाठी प्रकल्प तयार करण्यात संशोधन, सहाय्य करणे, सहयोग करणे आणि मदत करणे.

४. साहित्य आणि दृकश्राव्य आणि चित्रपट, सहकार्य आणि संबंधित विषयांवर फिल्मस्ट्रिप्स यासह इतर साधनांची निर्मिती आणि प्रकाशनाची व्यवस्था करणे.

५. नियतकालिक, जर्नल्स, वर्तमानपत्रे, पत्रके, माहितीपत्रके, पुस्तके, चित्रपट, प्रसारण, टीव्ही आणि सहकारी चळवळीच्या विकासासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याच्या माध्यमातून सहकारी संस्थांच्या यशास प्रसिद्धी देणे.

६. माहिती कार्यालय आणि ग्रंथालय व्यवस्था करणे.

७. सहकार धोरणाच्या बाबींवर मत व्यक्त करणे आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारतीय सहकारी चळवळीचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करणे. ७.

८. राष्ट्रीय सहकारी काँग्रेस आणि सहकारी चर्चासत्रे, सभा, परिषद, प्रदर्शन इत्यादींचे आयोजन करणे.

९. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्य परिषदांमध्ये भाग घेण्यासाठी संघटनेच्यावतीने प्रतिनिधी आणि निरीक्षक निवडणे.

१०. सहकारी संस्थांची पदोन्नती सुलभ करणे आणि सभासद संस्थांना त्यांच्या समस्या व अडचणी सोडविण्यासाठी आणि कार्यक्रम तयार करण्यात आणि त्यांच्या अंमलबजावणीत आणि देशातील सहकारी चळवळीतील लोकशाही चरित्र जपण्यासाठी आणि त्यांचे संरक्षण करण्यास मदत करणे.

११. प्रख्यात सहकार्यांना सन्मान प्रदान करणे.

१२. युनियनच्या भरभराटीसाठी विक्री, भाडेपट्टी किंवा अन्यथा स्थावर मालमत्ता विकत घेणे, भाड्याने घेणे, खरेदी करणे किंवा त्यांची विल्हेवाट लावणे.

१३ . आवश्यक माहितीचे दस्तऐवजीकरण करून सहकाराच्या आंतरराष्ट्रीय विपणनास प्रोत्साहित करणे आणि भारतीय सहकारी चळवळीच्या फायद्यासाठी नोडल एजन्सी म्हणून काम करणे.

१४ . सहकारी संस्थांना सल्लामसलत सेवा प्रदान करणे.

१५ . पुढीलप्रमाणे निधी उभा करणे. (अ) सहकारी शिक्षण निधी, (ब) राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण निधी, (क) कॉर्पस फंड, (ड) राखीव निधी, (इ) बिल्डिंग फंड, (फ) गव्हर्निंग कौन्सिलने वेळोवेळी ठरविलेला कोणताही अन्य फंड इ.

१६. सामान्यत: संघटनांच्या उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी प्रासंगिक किंवा उपयुक्त मानल्या गेलेल्या असे उपक्रम किंवा कार्ये करणे.

### राष्ट्रीय सहकारी संघाचे सदस्यत्व

राष्ट्रीय सहकारी संघाचे सदस्यत्व पुढील संस्थासाठी खुले आहे. त्यात (i) राज्य सहकारी संघ (ii) राष्ट्रीय सहकारी संस्था/फेडरेशन (iii) केंद्रशासित प्रदेशांच्या सहकारी संघटना (iv) सहकारी व्यवसाय आणि अव्यावसायिक महासंघ (v) राज्य आदिवासी विकास सहकारी फेडरेशन (vi) बहु-राज्य सहकारी संस्था (vii) राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ, राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक, राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ, बांधण्यास मदत करणे, सहकार चळवळीत प्रत्यक्ष कार्य करणाऱ्यांना शिक्षण प्रशिक्षण व मार्गदर्शन करणे, सहकार चळवळीचा प्रवक्ता म्हणून काम करणे आणि प्रशिक्षणाच्या संदर्भात राज्याची भूमिका निश्चित करण्यात आली.

## राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण परिषद/(National Council for Co-operative Training-NCCT)

१९५३ मध्ये भारत सरकारने भारतीय रिझर्व्ह बँकेसमवेत संयुक्तपणे योजना तयार करण्यासाठी तसेच देशातील सहकारी विभाग आणि संस्थांना नोकरीसाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासंदर्भात सहकार प्रशिक्षण संस्था स्थापना करण्यासाठी समिती स्थापन केली. त्यानंतर १९६२ मध्ये भारत सरकारने सहकारी प्रशिक्षण समितीच्या स्थापनेस मान्यता दिली आणि सहकारी प्रशिक्षण संबंधित काम भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाकडे सोपविण्यात आले. जून १९७३ मध्ये भारत सरकारने प्रख्यात कृषी शास्त्रज्ञ डॉ.एम.एस.स्वामिनाथनच्या अध्यक्षतेखाली सहकारी शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन या विषयावरील तज्ज्ञ गटाची स्थापना केली.

एनसीसीटीची सध्याची रचना जुलै १९७६ मध्ये भारत सरकार, मंत्रालय आणि एनसीयूआयच्या पोटनियम १६A अंतर्गत कृषी मंत्रालयाच्या सहमतीने स्थापित करणे.

### उद्दीष्टे

१. सहकारी प्रशिक्षण संबंधित एकूणच धोरणे आणि योजना तयार करणे.

२. देशातील सहकारी विभाग आणि सहकारी संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासंदर्भात आयोजन आणि थेट व्यवस्था करणे.

३. सहकारी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण व्यवस्थेचे नियोजन आणि डिझाइनिंग सुलभ करण्यासाठी, प्रशिक्षणाच्या गरजाचे नियमितपणे मूल्यांकन करण्यासाठी भारत सरकार, वित्तपुरवठा संस्था यांच्याशी प्रभावी संबंध ठेवणे आणि त्यांचे समन्वय साधणे.

४. सहकारी प्रशिक्षण संस्था स्थापन आणि व्यवस्थापित करण्यासाठी संशोधन आवश्यक असलेल्या सहकारी संस्थांची समस्या ओळखणे आणि संशोधन अभ्यास आयोजित करणे.

५. सहकारी प्रशिक्षण संस्थांच्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे.

६. देशातील विविध संस्थांमध्ये सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षणातील उच्च शैक्षणिक मानके राखण्यासाठी आणि सहकार्यावरील अभ्यासक्रम आणि मानक पुस्तके सुचविणे.

७. शाळा व महाविद्यालयांमध्ये सहकार्याने शिक्षणास प्रोत्साहन देणे आणि या उद्देशाने अभ्यासक्रम व परीक्षेचे मानदंड सुचविणे व सहकार्याने मानक पाठ्य पुस्तकांच्या प्रकाशनाची व्यवस्था करणे.

८. सहकारी प्रशिक्षणातील विविध अभ्यासक्रमांचे मूल्यांकन करणे आणि सुधारणांच्या उपाययोजना सुचविणे.

९. सहकारी संस्थांना सल्लामसलत सेवांच्या तरतूदीची व्यवस्था करणे, विशेषतः व्यवस्थापनाच्या अडचणींवर.

१०. एकमेकांना सहकार्याने शेती करण्याचे आधुनिक कौशल्य मिळवण्याकरिता शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे आणि प्रशिक्षणाची व्यवस्था करणे.

११. लघु उद्योजकांना, विशेषत: ग्रामीण भागातील सहकाऱ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि त्यांच्या व्यवसायात वाढ करण्यासाठी सहकारी पद्धतींचा अवलंब करण्यासाठी प्रशिक्षणाची व्यवस्था करणे.

१२. देशातील सहकारी क्षेत्रातील इतर भागधारकांमधील सहकार्याच्या प्रोत्साहनाशी संबंधित प्रशिक्षण व इतर क्रियाकलापांची व्यवस्था करणे.

१३. सहकारी व्यवस्थापन संस्था उत्कृष्टतेचे केंद्र म्हणून बनविण्याचा प्रयत्न करणे.

१४. सहकार्याबाबत सतत संशोधन करणे जेणेकरून ते बदलते तंत्रज्ञान, पर्यावरण आणि क्षेत्रातील आवश्यकतानुसार विकसित होऊ शकेल.

१५. सोसायटीच्या अर्थसंकल्पीय समर्थन वाढविण्यासाठी प्रशिक्षण युनिटद्वारे विविध सशुल्क कार्यक्रमांची व्यवस्था करणे; आणि केंद्र सरकार, सहकारी संस्था व इतर संस्थांकडून अनुदान, फी, वर्गणी आणि योगदानाद्वारे निधी जमा करणे.

## युनिटद्वारे घेण्यात येणारे मुख्य कार्यक्रम

परिषदेच्या सर्व प्रशिक्षण युनिट कर्मचाऱ्यांचे ज्ञान, कौशल्य आणि वृत्ती वाढविण्यासाठी भारतातील सहकारी चळवळीतील सर्व क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देत आहेत. युनिटद्वारे घेण्यात येणारे प्रमुख क्षेत्रीय कार्यक्रम प्रामुख्याने पुढीलप्रमाणे आहेत.

१. कोअर प्रोग्राम म्हणून कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंटमध्ये उच्च पदविका.

२. जनरल मॅनेजमेंट प्रोग्राम.

३. सहकारी पत आणि बँकिंग

४. शहरी सहकारी बँकिंग

५. दीर्घकालीन वित्त

६. सहकारी विपणन आणि प्रक्रिया
७.ग्राहक सहकारी व्यवस्थापन
८. हातमाग सहकारी व्यवस्थापन
९. सहकारी लेखा व लेखापरीक्षण
१०. महिला सहकारी व्यवस्थापन
११. मत्स्यपालक सहकारी व्यवस्थापन
१२. आदिवासी सहकारी व्यवस्थापन
१३. सहकारी कायदा आणि संबंधित कायदे
१४. दुग्ध सहकारी व्यवस्थापन
१५. गृहनिर्माण सहकारी व्यवस्थापन
१६. औद्योगिक सहकारी व्यवस्थापन
१७. कामगार सहकारी व्यवस्थापन
१८. सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षण
१९. संगणक प्रोग्राम
२०. मायक्रो फायनान्स
२१. बचत गटांचे व्यवस्थापन

सहकारी व्यवस्थापन संस्था/(Institute of Co-operative Management – ICM)

देशाच्या विविध भागात १४ सहकारी व्यवस्थापन संस्था कार्यरत आहे. त्यांची नावे व स्थापना पुढीलप्रमाणे

१. चेन्नई - १९५४
२. मदुराई - १९८३ (तमिलनाडू)
३. तिरुवनंतपुरम - १९७६
४.कन्नूर - १९९२ (केरळ)
५. हैदराबाद हैदराबाद - १९५५ (आंध्र प्रदेश),
६. भुवनेश्वर - १९५५ (ओडिशा)
७.लखनऊ १९५६ (उत्तर प्रदेश)
८. गुवाहाटी - १९७४ (आसाम)
९. इम्फाल १९८८ (मणिपूर) - -
१०. देहरादून - १९६५ (उत्तरांचल)
११. जयपूर १९५६ (राजस्थान)
१२. पुणे - १९४७
१३. नागपूर - १९७२ (महाराष्ट्र)
१४. भोपाळ - १९६५ (मध्य प्रदेश)

अशा १४ संस्था सहकारी व्यवस्थापन संस्था देशाच्या विविध भागात कार्यरत आहे. या संस्थांची नावे, ठिकाण, पत्ता, संपर्क नंबर, ईमेल व वेबसाईट पुढीलप्रमाणे आहे.

## राज्य सहकारी संघ/(State Co-operative Union)

### इतिहास व वाटचाल

स्वातंत्र्य पूर्व काळात भारतातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती हलाखीची होती. सावकाराच्या चक्रव्यूहात तो इतका गुरफटला होता की, त्यातून सुटणे मुश्कील झाले होते. त्यातूनही तो सुटण्याचा केविलवाणा प्रयत्न ही करीत होता पण तो त्यात आणखी गुरफटत जात होता. त्यामुळे असंतोष खदखदत होता. १८७५ साली पुणे, अहमदनगर या जिल्ह्यात शेतकऱ्यांनी सावकाराविरूध्द बंड केला. लोकमान्य टिळकांनी शेतकरी वर्गाला ‘राष्ट्राचा आत्मा' संबोधून त्या वर्गाची सुधारणा होण्याची निकड वेळोवेळी केसरीमध्ये लेख लिहून जनतेच्या नजरेस आणली. या सर्वांचा परिणाम म्हणून शासनाने १९०४ साली भारताचा को ऑप क्रेडिट सोसायट्यांचा पहिला कायदा पास केला. आणि १९०५ साली धारवाड जिल्ह्यात कंगिनहल येथे पहिली शेतकी पतपेढी सुरु झाली.

### राज्य सहकारी संघाचे उद्दिष्टे

१. सहकारी संस्थांचे सभासद, भावी सभासद, सहकारी कार्यकर्ते आणि सहकारी संस्थांमधील सेवक यांना सहकारी शिक्षण व प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे, करवून घेणे तसेच सहकारी तत्वे, मुल्ये व कार्यप्रणाली लोकप्रिय करणे.

२. सहकारी शिक्षणासंबंधीच्या सर्व बाबतीत एकसुत्रता घडवून आणणारी संस्था म्हणून काम करणे आणि सहकारी शिक्षणासंबंधीच्या प्रश्नांच्या बाबतीत तज्ञ संस्था म्हणून काम करणे. .

३. महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळीवर परिणाम करणाऱ्या निरनिराळया प्रश्नावर सहकारी कार्यकर्त्यांच्या मताचे दिग्दर्शन करण्यास व योग्य त्या अधिकारी व्यक्तिपुढे किंवा ठिकाणी असे मत मांडण्यास राज्यातील सहकारी चळवळीचा प्रवक्ता म्हणून काम करणे आणि या विषयाचा प्रचार करून या बाबत जनमत तयार करणे.

४. सहकारी चळवळीच्या प्रसारास मदत करणे.

५. सहकारी चळवळी संबंधीच्या प्रश्नांचा अभ्यास करणे व अशा कार्यास उत्तेजन देणे. तसेच सहकारी चळवळीसंबंधीचे संशोधन हाती घेणे. अशा कार्यास चालना देणे. शिवाय राज्यात सहकारी क्षेत्राचे संदर्भात सल्ला देणारे सेवा केंद्र म्हणून काम करणे.

६. शिक्षण व प्रशिक्षण वर्ग जिल्हा सहकारी बोर्ड व सहकार प्रशिक्षण केंद्र अगर महाविद्यालये तसेच सहकारी व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था चालविणे.

७. सहकार ग्रामिण विकास आणि तत्संबंधीच्या विषयावर नियतकालीके, पुस्तिका, पुस्तके आदी प्रकाशित करणे.

८. सहकारी संस्थांतील परस्पर संबंध वृध्दींगत करणे आणि विविध क्षेत्रातील सहकारी संस्थांच्या कार्यामध्ये समन्वय साधण्यासाठी मदत करणे.

## महाराष्ट्रातील सहकारी प्रशिक्षण, शिक्षण व सल्ला /प्रशिक्षण केंद्र
## (Co-operative Training, Education & Consultancy in Maharashtra)

सहकाराच्या शिक्षण आणि प्रशिक्षणाची गरज विचारात घेतल्यानंतर हे शिक्षण व प्रशिक्षण कुणाला द्यावे या मुद्द्यांचा विचार करण्यापूर्वी सहकार शिक्षण आणि प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम काय असावा याचा विचार करणे आवश्यक आहे. सहकार्याच्या शिक्षण आणि प्रशिक्षणामध्ये खालील बाबींचा समावेश असावा.

१. सहकार चळवळ :

यात सहकार या शब्दाचा अर्थ, चळवळीचा उगम, विकास, आवश्यकता, सहकाराची तत्वे आणि सहकाराचे भारतीय अर्थव्यवस्थेतील स्थान.

२.विविध सहकारी संस्था :

सहकाराच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारच्या संस्था त्यात कृषी संस्था, अकृषी संस्था, ग्रामीण व शहरी पतसंस्था, सहकारी शेती, सहकारी साखर कारखाने, ग्रामीण भागातील सहकारी बँका, शहरी भागातील सहकारी बँका, त्यांची स्थापना, कार्यपद्धती, संस्था नोंदणी, नोंदणीचे प्रमाणपत्र आणि प्रत्यक्ष कार्यपद्धती इ.

३. सहकारी संस्थांचे व्यवस्थापन :

यात सहकाराच्या संदर्भातील देशातील व राज्यातील वेगवेगळया व्यवस्थापनाचे पैलु, महत्त्वाची कागदपत्रे, खाते पुस्तिका, खाती पुस्तकांचे अंतिम परीक्षण, विविध लेखे, लेखांचे अंकेशन, अंतिम खाती, सभासदांच्या सभा व त्यांची इतिवृत्त इ. समावेश असतो.

४. सहकार्य विषयक कायदे :

सहकाराचे देशातील आणि राज्यातील महत्त्वाचे कायदे, त्यातील महत्त्वाच्या तरतुदी, सहकाराच्या संदर्भातील न्यायालयाचे प्रमुख निर्णय इ. यात समावेश असतो.

५. सरकार आणि सहकार :

सहकाराच्या संदर्भातील शासनाची भूमिका, शासनाच्या विविध योजना, सरकारी मदत, मदतीचा उपयोग करणे, शासनाला सादर करावयाची विविध प्रकारची माहिती, सहकार खात्याच्या निबंधकाची कार्य, सहकार मंत्रालयाची भूमिका इ. यात समावेश असतो.

६. सहकार आणि आर्थिक व सामाजिक परिवर्तन :

आर्थिकदृष्ट्या दुर्बलांची चळवळ, सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकास कसा करावयाचा, स्वावलंबन, नीतिमत्ता, सहकार्य वृत्ती, सहकारी संस्थांची गुणात्मक वाटचाल, सरकारचे सहाय्य व विविध तरतुदी इ. यात समावेश असतो.

७.प्रगत सहकारी संस्थांना भेटी देणे :

सहकारी शिक्षण व प्रशिक्षण यामध्ये केवळ सैद्धांतिक बाजूचा विचार न करता देशातील व राज्यातील अनेक प्रगत सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, दुग्धविकास संस्था, कुकूटपालन

व्यवसाय, विविध कार्यकारी संस्था, प्रगत सहकारी बँका, सहकारी बाजार, ग्राहक सहकारी भांडार यांना भेटी देणे. तिथे काही दिवस प्रशिक्षण घेणे, संबंधित संस्थांनी केलेल्या विकासविषयक कार्यातील अनुभव मिळविणे आणि या ज्ञानाचा व अनुभवाचा त्यांच्या परिसराच्या विकासासाठी उपयोग करणे इ. यात समावेश असतो.

## महाराष्ट्रातील सहकार शिक्षण व प्रशिक्षणाचा विकास

भारत व महाराष्ट्रातील सहकार शिक्षण व प्रशिक्षणाचा विकास हा पुढील प्रमाणे झाला आहे.

१. अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती हेच शिक्षण देश :

सहकार चळवळीच्या सुरुवातीच्या काळात सहकारी खात्यांच्या अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती हेच सहकारी शिक्षण समजले जात असे. अर्थात अधिकाऱ्यांच्या मदतीने काही ठिकाणी माहिती देण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकत्र बोलण्याची पद्धत होती.

२.१९१२ पासून सहकारी शिक्षण वर्ग :

सहकारी संस्थांच्या नोकर वर्गास योग्य पद्धतीने शिक्षण देण्याची आवश्यकता असल्याबद्दल खात्री झाल्यामुळे कै. गोपाळकृष्ण गोखले यांनी काही सहकारी व्यक्ती व सरकारी अधिकारी यांच्या मदतीने १९१२ पासून सहकारी शिक्षण वर्ग सुरू केले. हे वर्ग सर्व्हन्ट्स ऑफ इंडिया सोसायटीच्यावतीने भरविले जात असत. विशेषतः मुंबईमधील गिरणी कामगारांच्या सोसायटीचे सभासदांना शिक्षण देण्यासाठी त्यांनी अनेक वर्ग भरविले. सहकार खात्यानेही या वर्गांना शक्यतो परी सर्व सहाय्य केले.

३. प्रशिक्षणासाठी इन्स्टिट्यूटची स्थापना :

व्यक्तिगत प्रयत्नाने त्रोटक शिक्षण वर्ग भरविणे ऐवजी सहकारी शिक्षणाची कायम योजना आखणे आवश्यक आहे. अशी सूचना सर्व्हन्ट्स ऑफ इंडिया सोसायटीचे एक सदस्य आणि मजूर पुढारी एन. एम. जोशी यांनी १९१६ मध्ये सरकारला केली. यानंतर १९१७ मध्ये राजबहादुर एस. एस. तालमाकी यांनी प्रांतिक सहकारी परिषदेपुढे सहकारी संस्था व त्यांचे सामाजिक आणि शैक्षणिक कार्य या विषयावर एक निबंध वाचून दाखविला. या निबंधातील विचारांना अनुसरून प्रशिक्षणासाठी इन्स्टिट्यूटची स्थापना करण्यासंबंधी एक ठराव परिषदेने पास केला. त्यासंबंधी आवश्यक ती उपाययोजना करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीच्या शिफारशीनुसार १३ जुलै १९१८ रोजी मुंबई सेंट्रल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटची स्थापना झाली आणि १९१२ च्या सहकार कायद्याखाली नोंदवण्यात आली. >>

४. इन्स्टिट्यूटच्या शिक्षणाचा विस्तार :

मुंबई सेंट्रल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटने शिक्षण व प्रचाराचे कार्य आपल्याकडे घेतल्यानंतर सेक्रेटरी व विद्यार्थीसाठी सहकारी शिक्षण वर्ग सुरू केले. कामगार व नोकरवर्गाच्या सोयीसाठी रात्रीचे वर्गदेखील इन्स्टिट्यूटने चालविले. मुंबई शहरातील शिक्षणवर्गाबरोबरच जिल्ह्याच्या ठिकाणीदेखील प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात आले. नंतर बँकेचा नोकरवर्ग व इतर संस्थांचा नोकरवर्ग यांच्यासाठी इंग्रजीतून शिक्षण वर्ग सुरू करण्यात आले. ऑक्टोबर १९२० मध्ये गिरगावात एक शाखा सुरू करण्यात आली याच वर्षी नोव्हेंबरमध्ये पुणे, धारवाड आणि भडोच येथे जिल्हा शाखा सुरू केल्या. याशिवाय अनेक जिल्ह्यात सहकारी शिक्षण वर्ग भरविण्याचे कार्य चालू ठेवले. रात्रीचे वर्गही मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्यामुळे कामाचे प्रमाण वाढले. या सर्व वर्गाची तपासणी शिक्षण खात्याचे इन्स्पेक्टर करत असत.

५. सहकारी विद्यालयाची स्थापना :

१९२२ मध्ये शिक्षण व्यवस्थेसाठी एक स्वतंत्र असिस्टंट रजिस्टार नेमण्यात आला. १९२३ मध्ये मुंबई येथे पगारी सेक्रेटरी नेमून त्याच्याकडे सहकाराचा प्रचार व तपासण्याची जबाबदारी सोपविली. १९२५ मध्ये प्रांतिक सहकारी कायदा मंजूर झाल्यानंतर या कायद्यानुसार इन्स्टिट्यूटला मान्यता देण्यात आली. १९२६ मध्ये सेंट्रल एज्युकेशन बोर्ड स्थापन करण्यात आले. या बोर्डाकडे शिक्षण वर्गासाठी अभ्यासक्रम ठरविणे, त्यांच्या परीक्षा घेणे आणि यशस्वी विद्यार्थ्यांना पदविका प्रमाणपत्र इत्यादी देणे ही कामे सोपविण्यात आली. १९२७ मध्ये जिल्हा व विभागीय प्रसिद्धी अधिकारी नेमण्यात आले. शिक्षण कार्यासाठी केवळ सेक्रेटरीचे वर्ग चालविणे पुरेसे नाही असे वाटल्यामुळे आणि सहकारी शिक्षणाची सर्वत्र मागणी होऊ लागल्यामुळे जुलै १९२८ मध्ये इन्स्टिट्यूटने पुणे, सुरत आणि धारवाड येथे सहकारी विद्यालय सुरू केले. त्या ठिकाणी हे विद्यालय स्थानिक सहकारी कार्यकर्त्यांच्या मदतीने सुरू ठेवण्याचे धोरण ठेवले होते. विद्यालय चालवण्यासाठी लागणारा खर्च फिच्या रूपाने व इन्स्टिट्यूटला मिळणाऱ्या अनुदानाच्या रूपाने भागविला जात असे. शक्य असेल

६. सहकारी शिक्षणाची जबाबदारी सहकार खात्याकडे :

१९३० च्या सुमारास जागतिक मंदीचा परिणाम सहकारी संस्थांच्या व्यवहारावर मोठ्या प्रमाणावर झाल्यामुळे सहकारी शिक्षणाची मागणी पुन्हा कमी होऊ लागली. १९३१ मध्ये विद्यार्थ्यांच्या अभावी सुरत येथील विद्यालय बंद करावे लागले. तर प्रसिद्धी अधिकाऱ्यांच्या जागादेखील काही ठिकाणी कमी केल्या. १९३६ मध्ये केंद्र सरकारने सहकारी शिक्षणकार्यासाठी रुपये पंधरा लाख मंजूर केले आणि मुंबई प्रांतासाठी जवळजवळ दोन लाखांवर रक्कम या कार्यासाठी सोपविली. या मदतीमुळे सहकारी शिक्षण कार्य स्वतःकडे घेण्याचे सहकारी खात्याने ठरविले आणि त्यादृष्टीने योजना आखून शिक्षण देण्यासाठी इन्स्पेक्टरची नेमणूक केली. तसेच या कार्यावर देखरेख करण्यासाठी एक असिस्टंट रजिस्टारची नियुक्त करण्यात आली.

७. शिक्षण व प्रशिक्षणाची जबाबदारी सहकार खात्याकडे :

सहकार खात्याने सहकारी शिक्षण स्वतःकडे घेतल्यामुळे इन्स्टिट्यूटच्या कार्याची प्रगती थांबली आणि उलट दिशेने प्रवास सुरू झाला. पुणे येथील शाळेखेरीज सर्व विद्यालय बंद करावी लागली. तसेच १९३९ साली सर्व जिल्हा शाखादेखील इन्स्टिट्यूटला बंद कराव्या लागल्या. जिल्ह्यातील आपले काम शाखांमार्फत चालविले होती परंतु शाखा बंद झाल्यामुळे सोसायट्याबरोबर असलेला संबंध तुटला आणि इन्स्टिट्यूटने आपले काम जवळजवळ स्थगित केले.

८. सहकारी शिक्षण व नियोजन समिती स्थापना :

१९४६ मध्ये लोकप्रिय मंत्रिमंडळ अधिकारावर आल्यामुळे सर्व आर्थिक घडामोडींना वेगळेच वळण मिळाले. मुंबई राज्यामुळे देशातील प्रमुख सहकारी कार्यकर्ते वैकुंठभाई मेहता यांची प्रांताचे अर्थ, सहकार व ग्रामोद्योग खात्याचे मंत्री म्हणून नेमणूक झाली.

९.रिझर्व बँकेची भूमिका :

पंचवार्षिक योजना सुरू झाल्यापासून सहकारी सोसायट्यांच्या विकासाकडे सरकारने अधिक लक्ष देण्यास सुरुवात केली. सहकारी सोसायटी यांचा कारभार योग्य त्या कार्यक्षमतेने चालत राहिला तरच त्यांना रिझर्व बँकेकडून सवलतीच्या दराने पुरेशा रकमेचा कर्जपुरवठा होण्याची शक्यता असल्यामुळे पुणे येथील को-ऑपरेटिव्ह

## प्रादेशिक सहकारी व्यवस्थापन संस्था/(Regional Institute of Co-operative Management - RICM)

देशातील विविध प्रशिक्षण क्षेत्रांमध्ये स्थित असलेल्या पाच प्रादेशिक सहकारी व्यवस्थापन संस्था कार्यरत आहे. त्यामध्ये
१. बंगळुरू - १९४२ (कर्नाटक)
२. चंदीगड - १९५६ (चंदीगड)
३. गांधीनगर - १९५६ (गुजरात)
४.पटना १९५४-५५ (बिहार) -
५.कल्याणी १९५६ (पश्चिम बंगाल)
या संस्थांची नावे, ठिकाण, पत्ता, संपर्क नंबर, ईमेल व वेबसाईट पुढीलप्रमाणे आहे.

## वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था पुणे, महाराष्ट्र/ (Vaikunth Mehta National Institute of Co-op. Mgt. Pune)

वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट ही सहकारी क्षेत्राची एक प्रमुख व्यवस्थापन संस्था आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट, पुणे यांचे प्रशासकीय व वसतिगृह २५४०१.७६ चौरस फूट क्षेत्रात बांधले गेले आहेत. प्रशासकीय ब्लॉकमध्ये बहुतेक आधुनिक वर्ग खोल्या, कॉन्फरन्स रूम, ग्रंथालय, संगणक खोल्या, प्राध्यापक खोल्या इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे वसतिगृहाच्या ब्लॉकमध्ये सुमारे १२० सहभागींसाठी सामान्य सुसज्ज निवास व्यवस्था, सामान्य खोल्या, ग्राहकांचे दुकान, जेवणाचे खोली, एक सभागृह आहे ज्यात कॉन्फरन्स/सेमिनार आणि इतर महत्वाच्या कार्ये आयोजित करण्यासाठी ज्यात २०० पेक्षा जास्त लोकांना सामावून घेण्याची सोय आहे.

पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन बिझिनेस मॅनेजमेंटच्या सुमारे ७५ विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृह आणि पीजीडीएमसाठी मुलींचे वसतिगृह बांधण्यात आले आहे. कॅम्पसमधील कम्युनिटी सेंटर मनोरंजन सुविधा प्रदान करते आणि सामाजिक कार्ये आयोजित केली जातात. याशिवाय अतिथी-आधुनिक सुविधा असलेले आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स हॉल आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट कॉम्प्लेक्समध्ये संचालक, प्राध्यापक, संकाय सदस्य आणि अधीनस्थ कर्मचाऱ्यांसाठी पुरेशी कर्मचारी संख्या आहे. येथे एक स्वतंत्र अतिथीगृह आहे, ज्यात स्वतंत्र जेवणाची सुविधा आणि वातानुकूलित खोल्या आहेत. एनसीसीटीच्या सर्व प्रशिक्षण संस्थांमध्ये आधुनिक वर्गखोल्या, ग्रंथालये, संगणक खोल्या, विद्याशाखा खोल्या, वसतिगृहे इत्यादी मूलभूत सुविधा पुरविल्या आहेत. काही प्रशिक्षण संस्थांमध्ये कॅम्पस प्रशिक्षणासाठी सभागृह, कॉन्फरन्स रूम इ. वापरकर्ता संघटनांच्या विनंतीनुसार संस्थांच्या आवारात प्रशिक्षण कार्यक्रमही आयोजित केले जातात. व्याख्यान, चर्चा, गटचर्चा, वादविवाद, चर्चासत्रे, पॅनेल चर्चा, कार्यशाळा, केस पद्धत आणि चित्रपट/ऑडिओ व्हिज्युअल राण्न

सहकार चळवळीचे दिवंगत श्री वैकुंठ मेहता यांच्या अभिवादनार्थ एप्रिल १९६७ मध्ये राष्ट्रीय संस्थेचे नाव वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था (VAMNICOM) असे ठेवण्यात आले. भारत

सरकार VAMNICOM ची स्थापना व इतर खर्चाची पूर्तता करण्यासाठी राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण परिषद (एनसीसीटी), नवी दिल्ली यांना अनुदान-सहाय्य देते. वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट अनेक वर्षांपासून सहकारी चळवळीत व्यवस्थापन प्रशिक्षण, व्यवस्थापन शिक्षण, संशोधन व प्रकाशन, कन्सल्टन्सी आणि इतर संबंधित कार्य करीत आहे.

**व्हिजन, मिशन आणि फोकस**

**व्हिजन :**

सहकारी चळवळीसाठी वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था, पुणे ही बौद्धिक व तंत्रिका केंद्र म्हणून काम करते. विविध सहकारी संस्था, सरकारी विभाग आणि इतर राष्ट्रीय संस्था प्रशिक्षण, शिक्षण, संशोधन आणि सल्लामसलत गरजा यांच्या माध्यमातून व्यवस्थापन विकासाची पूर्तता करते.

**मिशन :**

वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्थाचे मुख्य ध्येय हे व्यवस्थापन विकास, प्रशिक्षण, शिक्षण, संशोधन आणि सल्लामसलत यांच्या माध्यमातून सहकारी व्यवस्थापकांच्या वाढत्या संख्येमध्ये मुख्य पदांवर मनुष्य व्यवस्थापकांची केडर बनविणे सुलभ करणे आहे.

**फोकस :**

सहकारी क्षेत्रातील सराव व्यवस्थापकांचे निर्णय घेण्याची कौशल्ये आणि प्रशासकीय क्षमता सुधारित करण्यावर जास्त भर दिला जातो.

**मॅनेजमेंट ट्रेनिंग आणि एज्युकेशन**

वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्थाची सहा केंद्रे आहेत. ती म्हणजे

१. कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट सेंटर (CCM-सीसीएम),

२. व्यवस्थापन शिक्षण केंद्र (CME-सीएमई),

३. माहिती तंत्रज्ञान केंद्र (CIT-सीआयटी),

४. संशोधन केंद्र आणि प्रकाशन केंद्र,

५. लिंग अभ्यास अध्ययन केंद्र (CGSसीजीएस) आणि

६. व्यवस्थापन विकास कार्यक्रमांसाठी केंद्र (CMDPसीएमडीपी).

---

**संदर्भग्रंथ**

१) डॉ.धीरजझाल्टेवइतर, सहकार: सिद्धांतआणिकार्यपद्धती(२०२०), प्रशांतपब्लिकेशन,जळगाव.

२) प्रा.नंदालहाडे, सहकार (२०१३), आयडॉलपब्लिकेशन, पुणे.

३) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यास क्रम संशोधन मंडळ ,पुणे : सहकार

४) तापकीर मुकुंद व साबळे आर.जे. (२००५), सहकार ,निराली प्रकाशन ,पुणे

५) डॉ. आर के दातीर (२००९) ‘भारतातील बँक व्यवसाय आणि सहकार , निराली प्रकाशन,पुणे

६) जोशी सी जे (१९८६ ), सहकार , फडके प्रकाशन, कोल्हापूर